**महाराष्ट्र दुय्यम सेवा, गट-ब (अराजपत्रित) (पूर्व) व (मुख्य) स्पर्धा परीक्षा**

**Maharashtra Subordinate Services, Gr. B**

**(Non-Gazetted) (Pre) & (Main) Competitive Exam**

**परीक्षेचे टप्पे :- १. संयुक्त पूर्व परीक्षा – १०० गुण**

**२. मुख्य परीक्षा - ४०० गुण** (पेपर क्र.-१ संयुक्त व पेपर क्र.२ स्वतंत्र)

**महाराष्ट्र दुय्यम सेवा, गट-ब (अराजपत्रित) संयुक्त (पूर्व) परीक्षा.**

**Maharashtra Subordinate Service, Gr.-B. (Non-Gazetted)**

**Combined (Pre) Exam**

## -:परीक्षा योजना :-

**प्रश्नपत्रिकेची संख्या - एक.**

| विषय व संकेतांक | प्रश्नसंख्या | एकुण गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| सामान्य क्षमता चाचणी (संकेतांक क्र. ०१२) | १०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

## -: अभ्यासक्रम :-

| अनु. क्र. | विषय |
|---|---|
| **सामान्य क्षमता चाचणी** | |
| १) | **चालु घडामोडी** - जागतिक तसेच भारतातील. |
| २) | **नागरिकशास्त्र** - भारताच्या घटनेचा प्राथमिक अभ्यास, राज्य व्यवस्थापन (प्रशासन) ग्राम व्यवस्थापन (प्रशासन). |
| ३) | **इतिहास** -आधुनिक भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा इतिहास. |
| ४) | **भूगोल** (महाराष्ट्राच्या भूगोलाच्या विशेष अभ्यासासह) - पृथ्वी, जगातील विभाग, हवामान, अक्षांश-रेखांश, महाराष्ट्रातील जमिनीचे प्रकार, पर्जन्यमान, प्रमुख पिके, शहरे, नद्या, उद्योगधंदे, इत्यादी. |
| ५) | **अर्थव्यवस्था** —<br>**भारतीय अर्थव्यवस्था** - राष्ट्रीय उत्पन्न, शेती, उद्योग, परकीय व्यापार, बँकिंग, लोकसंख्या, दारिद्रय व बेरोजगारी, मुद्रा आणि राजकोषीय नीति, इत्यादी.<br>**शासकीय अर्थव्यवस्था** - अर्थसंकल्प, लेखा, लेखापरीक्षण, इत्यादी. |
| ६) | **सामान्य विज्ञान** - भौतिकशास्त्र (Physics), रसायनशास्त्र (Chemistry), प्राणिशास्त्र (Zoology), वनस्पतीशास्त्र (Botany), आरोग्यशास्त्र (Hygiene). |
| ७) | **बुध्दिमापन चाचणी व अंकगणित**<br>**बुध्दिमापन चाचणी** — उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करु शकतो हे आजमावण्यासाठी प्रश्न<br>**अंकगणित** — बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, दशांश, अपूर्णांक व टक्केवारी. |

**टीप** — सदर मुख्य परीक्षेची सुधारित परीक्षा योजना वर्ष २०२० च्या होणाऱ्या परीक्षा पासून लागू राहील.

**दिनांक - ०४/०३/२०२०**

**सचिव**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

MPSCDaily.com

**सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

# पोलीस उपनिरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) मुख्य परीक्षा
# Police Sub Inspector, Gr.-B (Non-gazetted) Main Exam

## -: परीक्षा योजना :-

**प्रश्नपत्रिकांची संख्या - दोन** **एकूण गुण — ४००** **पेपर क्र.-१ (संयुक्त पेपर) -२०० गुण**
**पेपर क्र.-२ (स्वतंत्र पेपर) -२०० गुण**

| पेपर क्र. व संकेतांक | विषय | गुण | प्रश्नसंख्या | दर्जा | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ (संकेतांक ०१४) | मराठी | १०० | ५० | मराठी - बारावी | मराठी | एक तास |
| | इंग्रजी | ६० | ३० | इंग्रजी - पदवी | इंग्रजी | |
| | सामान्य ज्ञान | ४० | २० | पदवी | मराठी -इंग्रजी | |
| २ (संकेतांक ५०५) | सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान | २०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास |

## अभ्यासक्रम

**पेपर क्रमांक - १ - मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.**

| अनु.क्र. | विषय |
|---|---|
| १. | **मराठी :-** सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्यप्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे |
| २. | **इंग्रजी : -** Common Vocabulary, Sentence structure, Grammar, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage. |
| ३. | **सामान्य ज्ञान** |
| | १. **चालू घडामोडी** - जागतिक तसेच भारतातील. |
| | २. **माहिती अधिकार अधिनियम, २००५ व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५** |
| | ३. **संगणक व माहिती तंत्रज्ञान** - आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका, वेगवेगळ्या क्षेत्रातील जीवनात संगणकाचा वापर, डाटा कम्युनिकेशन, नेटवर्कींग आणि वेब टेक्नॉलॉजी, सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध, नवीन उद्योग म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा निरनिराळ्या सेवा सुविधांची माहिती मिळण्यासाठी होणारा उपयोग, भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योगाची वाढ व त्याचा दर्जा, शासनाचे कार्यक्रम जसे मिडीया लॅब एशिया, विद्या वाहिनी, ज्ञान वाहिनी, सामुहिक माहिती केंद्र, इत्यादी. माहिती तंत्रज्ञान उद्योगातील मुलभूत प्रश्न व त्याचे भवितव्य. |

MPSCDaily.com

**पेपर क्रमांक - २ सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.**

| अनु.क्र. | विषय |
|---|---|
| १. | **बुध्दिमत्ता चाचणी** |
| २. | **महाराष्ट्राचा भूगोल** - महाराष्ट्राच्या रचनात्मक (Physical) भूगोल, मुख्य रचनात्मक (Physiographic) विभाग, हवामान(Climate), पर्जन्यातील विभागावर बदल, नद्या, पर्वत, डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकिय विभाग, नैसर्गिक संपत्ती - वने व खनिजे, मानवी व सामाजिक भूगोल - लोकसंख्या (Population), Migration of Population व त्याचे Source आणि Destination वरील परिणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्या व त्यांचे प्रश्न, संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान. |
| ३. | **महाराष्ट्राचा इतिहास** - सामाजिक व आर्थिक जागृती (१८८५-१९४७), महत्वाच्या व्यक्तींचे काम, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम/भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळ. |
| ४. | **भारतीय राज्यघटना** - घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे/ठळक वैशिष्टये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे-शिक्षण, युनिफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका. |
| ५. | **मानवी हक्क व जबाबदाऱ्या** - संकल्पना- आंतरराष्ट्रीय मानवी हक्क मानक, त्यासंदर्भातील भारतीय राज्यघटनेतील तरतूद, भारतातील मानवी हक्क व जबाबदा-या यंत्रणेची अंमलबजावणी व संरक्षण, भारतातील मानवी हक्क चळवळ, मानवी हक्कापासून वंचित राहण्याच्या समस्या, गरीबी, निरक्षरता, बेकारी, सामाजिक-सांस्कृतिक- धार्मिक प्रथा यासारख्या अडचणी, (हिंसाचार, भ्रष्टाचार, दहशतवाद, कामगारांचे शोषण, संरक्षित गुन्हेगारी, इत्यादी.) लोकशाही व्यवस्थेतील एकमेकांचे हक्क आणि मानवी प्रतिष्ठा व एकतेचा आदर करण्यासंबंधी प्रशिक्षणाची गरज व महत्व, नागरी हक्क संरक्षण अधिनियम, १९५५, मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम १९८९, हुंडाबंदी अधिनियम १९६१, महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान. |
| ६. | **महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ (Maharashtra Police Act)** |
| ७. | **भारतीय दंड संहिता, १८६० (Indian Penal Code)** |
| ८. | **फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (Criminal Procedure Code)** |
| ९. | **भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ ( Indian Evidence Act.)** |

**दिनांक - ०४/०३/२०२०**

**सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

MPSCDaily.com